माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : १४८०/२०२२**

**अपिलार्थी, श्री.नरेशकुमार स्वरुपचंद जैन,**
**मु.पो.ता.देवरी, जि.गोंदिया,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन कार्यालय, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०१.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.११.२०२१ | -- | १०.०१.२०२२ | ०३.०३.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०१.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " रा.प. यवतमाळ विभागातील उमरखेड आगारातील अनेक प्रवासी बसेस पावसाळ्यात गळती होत असल्याबाबत तसेच अनेक बसेसमध्ये काचेच्या जागी पत्रे लावूनच बसेस प्रवासी वाहतूक मार्गस्थ करण्यात येत असल्याबाबत दि.१४.०७.२०२१, २२.०७.२०२१, २३.०९.२०२१ व दि.१८.१०.२०२१ रोजी महाव्यवस्थापक (यं.अ.) रा.प.मुंबई यांचेकडे तक्रार केली असता त्यानुषंगाने महाव्यवस्थापक (यं.अ.) रा.प.मुंबई याच्याद्वारे करण्यात आलेली कार्यवाही विषयांकीत प्रकरणाची चौकशी करण्याकरिता संबंधितांना देण्यात आलेल्या पत्राची प्रत तसेच त्यानुसार संबंधिताकडून यं.अ.खातेकडे आलेल्या चौकशीची प्रत " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक १०.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती पुरविली नाही" असे कारण नमूद

करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०३.०३.२०२२ रोजी सुनावणी घेऊन " जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे मान्य करण्यात येत असून नियमाधिन कालावधीत सदर अर्जाचा निपटारा करण्यात यावा. " असे नमूद करुन आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नूसार आयोगाकडे **दिनांक १८.०४.२०२२ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मोघम आदेश पारित केला. " असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २५.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सतिष मधुकरराव पलेरीया व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.अमोल चंद्रकांत गोसावी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता श्री.जैन यांनी दि.०१.११.२०२१ रोजी सादर केलेल्या माहिती अधिकार अर्जाचे अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ (३) अन्वये अर्ज हा विभागीय कर्मचारी अधिकारी, यवतमाळ यांचेकडे हस्तांतरित केला असून त्यांचेकडून माहिती प्रदान करण्यात येईल, असे नमूद केले आहे. तसेच अपिलार्थी श्री.जैन यांनी गळत्या बसेस विषयी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने विभागीय नियंत्रक रा.प.विभागीय कार्यालय, यवतमाळ यांना दि.०८.११.२०२१ रोजी सदर बाबीत वैयक्तीक लक्ष घालून तक्रारकर्ता श्री.जैन यांचे पत्रावर कार्यवाही करावी व त्याचा तपशील त्यांना अवगत करण्यात यावा. जेणेकरुन ते कार्यालयास वारंवार पत्र व्यवहार करणार नाहीत, असे नमूद केलेले आहे. त्यानुषंगाने विहीत मुदतीत कुठलीच माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थी श्री.जैन यांनी दि.१०.०१.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून प्रस्तुत प्रथम अपील अर्जावर दि.०३.०३.२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत नियमाधीन कालावधीत सदर अर्जाचा निपटारा करण्यात यावा, असे नमूद करीत प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी मागितलेल्या माहितीचे गांभीर्य व व्यापक जनहित लक्षात घेता, अपिलार्थी श्री. जैन यांनी राज्य परिवहन महामंडळ येथे दि.१४.०७.२०२१, दि.२२.०७.२०२१, दि.२३.०९.२०२१ व दि.१८.१०.२०२१ रोजी यवतमाळ विभागातील उमरखेड आगारातील अनेक सदोश बसेस विषयी केलेल्या तक्रारीवर प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत दस्तावेज स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावी तसेच या प्रकरणी मुख्यालयाने विभाग नियंत्रक यांनी

दि.०८.११.२०२१ व दि.०१.१२.२०२१ रोजी प्रदान केलेल्या पत्राच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अभिलेख कक्षात उपलब्ध असलेला अहवाल अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावा.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०१.२०२४**

जावक क्रमांक 2080 दिनांक 02 APR 2024

राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ